**SNDT Women's University**
1, Nathibai Thackersey Road,
Mumbai 400 020
Phone: +91 22 2203 1879
Fax: +91 22 2201 8226

**श्रीमती ना. दा. ठाकरसी महिला विद्यापीठ**
१, नाथीबाई ठाकरसी मार्ग
मुंबई ४०० ०२०
Telegram : UNIWOMEN
Website : sndt.ac.in

दिनांक:२० जून, २०२३

## नोटीस

विद्यापीठाच्या तिन्ही आवारातील वसतिगृह येथे मेस सेवा उपलब्ध करुन घेण्यासाठी दिनांक १७ मे, २०२३ रोजी GeM पोर्टल वर टेंडर प्रकाशित करण्यात आले होते. सदर टेंडरला अनुसरुन दिनांक १५ जून, २०२३ रोजी विद्यापीठाच्या मीनी समिती कक्ष येथे प्रि-बिड बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये काही निविदाकार उपस्थित होते, त्यानुसार खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.

१. GeM पोर्टल निविदा भरण्यासाठी दिनांक २३ जून, २०२३ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.
२. सुरक्षा ठेव (Security Deposit) ची रक्कम रु.१५ लाख ऐवजी रु.१० लाख करण्यात येत आहे.
३. विद्यापीठ आवाराच्या बाहेर जेवण पूवविण्याकरीता आकारण्यात येणारे वार्षिक शुल्क संदर्भात अट कमी करण्यात यावी अशी विनंती केली होती त्यास अनुसरुन खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.
   - विद्यापीठ आवाराच्या बाहेर जेवण उपलब्ध करुन देण्यासाठी वार्षिक शुल्क कमी करण्यात येत नाही. मात्र काही निविदाधारक हे मेस व्यतिरिक्त विद्यापीठ आवाराच्या बाहेरील ऑर्डर घेत असतात त्यासाठी निविदेमध्ये नमूद केलेल्या सूचनेप्रमाणे शुल्क कायम राहील.
   - मेस मध्ये उत्तम गुणवत्ताचे जेवण देण्यात यावे गुणवत्तेमध्ये कोणत्याही प्रकारची तडजोड करुन नये.
   - विद्यापीठामध्ये विविध प्राधिकरणांच्या बैठका प्रत्येक आवारामध्ये होतात, त्यासाठी सुध्दा जेवणाचे ऑर्डर समाविष्ट केले जाणार आहे.
   - विद्यापीठाच्या पूर्वपरवानगीने आवाराच्या बाहेर काही जेवणाच्या ऑर्डर असतील तर तशा प्रकारची परवानगी देता येईल. मात्र सेंट्रल किचन स्थापन केले जाणार नाही याची सुध्दा काळजी घेणे आवश्यक आहे.

उपरोक्त बदल व्यतिरिक्त मूळ निविदेमध्ये कोणतेही बदल करण्यात येत नाही.

(डॉ. विलास द. नांदवडेकर)
कुलसचिव